**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः01.01.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

- नवीन वर्षाचं सर्वत्र उत्साहात स्वागत, राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून जनतेला नवीन वर्षाच्या शुभेच्छा
- राज्यातली पर्यटनस्थळं नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आलेल्या पर्यटकांच्या गर्दीनं फुलली
- जल जीवन मिशन योजनेची कामं युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना
- कोरेगांव भीमा इथं आज होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज, आणि,
- ऊस गाळप हंगामात शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये यासाठी दक्षता घेण्याचे साखर आयुक्तांचे निर्देश

**नववर्ष शुभेच्छा**

मावळत्या सूर्याच्या साक्षीनं, सरत्या वर्षाला निरोप देत, नव्या आशा, नवी स्वप्नं, नवे संकल्प मनात घेऊन 2025 या नवीन वर्षाचं काल जगभरात उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आलं. नववर्षाच्या स्वागतासाठी देशभरात मध्यरात्री केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीनं आसमंत उजळून निघाला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

हे वर्ष सर्वांच्या जीवनात सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. महाराष्ट्राच्या प्रगतीची पताका अखंडीत फडकत ठेवण्याची ऊर्जा आणि उर्मी मिळत राहो, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेला नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**नववर्ष स्वागत**

संपूर्ण राज्यभरात काल मध्यरात्री नवीन वर्षाचं उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आलं. नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी नागरिकांनी पर्यटन स्थळी गर्दी केली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची पर्यटक निवासगृहं पूर्णपणे भरली असल्याचं वृत्त आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातही

भंडारदरा, घाटघर, रतनवाडी व्हॅली इत्यादी ठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी झाली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातले समुद्रकिनारे तसंच इतर पर्यटनस्थळं पर्यटकांनी फुलून गेले आहेत. कोकणात गेल्यावर्षीपेक्षा जास्त पर्यटक यावर्षी देश-परदेशातून तसंच राज्याच्या कानाकोपऱ्यातून आले आहेत. अनेक जण नवीन वर्षाचा प्रारंभ देवदर्शनानं करतात; त्यामुळे राज्यातली विविध धार्मिक ठिकाणही भाविकांनी गजबजली आहेत.

**मुख्यमंत्री आढावा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालही पुढील शंभर दिवसांत करायच्या कामांच्या अनुषंगानं विविध विभागांची आढावा बैठक घेतली.
पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या कामांचा आढावा घेताना जल जीवन मिशन योजनेची कामं युद्धपातळीवर पूर्ण करावीत. ही योजना संपूर्णपणे सौरउर्जेवर चालवावी अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. सहकार विभागाचा आढावादेखील मुख्यमंत्र्यांनी घेतला. साखर गळीत हंगामात ऊस क्षेत्र, ऊस उत्पादन आणि ऊस उत्पादकता याचा अचूक अंदाज येण्यासाठी कृत्रिम प्रज्ञा, रिमोट सेन्सिंग आणि जिओग्राफिक्स इन्फॉर्मेशन सिस्टीमचा वापर करावा, असं त्यांनी सांगितलं. राज्यात विविध सेवा सहकारी संस्थांमध्ये तीनशे ते हजार मेट्रीक टन क्षमतेची शंभर गोदामं बांधण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पात्र निराधारांना लाभ मिळण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी लाभ वितरण थेट लाभ हस्तांतरण पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट वर्ग करण्याची प्रक्रिया तत्काळ सुरू करावी असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

**मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाच्या कामात प्रकल्प विकासकांना काही अडीअडचणी येत असतील, तर संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी नियमित आढावा बैठक घेऊन त्या समस्या सोडवाव्यात आणि या संदर्भातला अहवाल पुढच्या 15 दिवसात मुख्यमंत्री कार्यालयाला सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत या प्रकल्पाची आढावा बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. हा प्रकल्प राबवताना आता प्रकल्प विकासकांना ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**मंत्रीपद भार**

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि ग्रामविकास तसंच पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी काल आपापल्या मंत्रालयांचा पदभार स्वीकारला. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला

प्राधान्य देणार असल्याचं सांगून राज्यात दर्जेदार रस्त्यांचं जाळं विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न असेल, असं आश्वासन शिवेंद्रसिंह भोसले यांनी दिलं. तर ग्रामीण भागातल्या मूलभूत सोयी-सुविधा अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार असून गरिबांसाठीच्या घरकुल योजनेला बळकटी देण्यासाठी 100 दिवसांत 20 लाख घरकुलांना मान्यता देण्याचा संकल्प असल्याचं गोरे यांनी सांगितलं.

**कोरेगांव**

कोरेगांव भीमा इथं आज होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना सुविधांची माहिती मिळावी यासाठी जिल्हा परिषदेनं 'विजयस्तंभ सुविधा' ॲप तयार केलं आहे. अभिवादन कार्यक्रमासाठी येणाऱ्या अनुयायांकरता जिल्हा प्रशासनानं विविध सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

सांगली जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी वटवाघुळांनी द्राक्षबागा फस्त करण्याचा प्रकार बऱ्याच ठिकाणी घडला होता. अशा वेळी नागठाणे इथले द्राक्ष बागायतदार धनाजी पाटील यांनी बदलतं हवामान आणि वटवाघुळांपासून द्राक्ष बागेचं संरक्षण करुन द्राक्षांचं चांगलं उत्पादन घेतलं. त्यांच्या शेतातल्या काळ्या द्राक्षांना प्रतिकिलो 137 रुपये भाव मिळाला. याविषयी माहिती देताना धनाजी पाटील म्हणाले,

**वाल्मिक कराड अटक**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आणि पवन ऊर्जा कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी फरार असलेला संशयित आरोपी वाल्मिक कराड काल पोलिसांना शरण आला. पुण्यात राज्य गुन्हे अन्वेषण विभागासमोर त्यानं शरणागती पत्करली. त्यानंतर बीडला नेण्यात येऊन 14 दिवसांची कोठडी देण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी आरोपींना शिक्षा करुन संतोष देशमुख यांना न्याय मिळवून दिला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**साखर आयुक्त**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांची; मुकादम, वाहतुकदार यांच्याकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी यंदाच्या गाळप हंगामात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पुण्यातील साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांनी दिले आहेत. कार्यकारी संचालक आणि खाजगी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत दक्षता घ्यावी असं त्यांनी

सांगितलं. ऊस तोडणीसाठी पैशाची मागणी केल्यास ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक उपसंचालक विश्वास देशमुख यांनी केलं आहे.
ऊस तोडणी मजूर आणि मुकादम, वाहतूक कंत्राटदार यांच्याकडून ऊस तोडणी करताना विविध कारणं सांगून ऊस तोडणीसाठी शेतकऱ्यांकडून रोख पैशांची अथवा अन्य वस्तू, सेवा यांची मागणी केली जाते. मागणीप्रमाणे पैसे दिले नाही तर ऊस तोडणीस टाळाटाळ केली जाते किंवा ऊस योग्य प्रकारे तोडला जात नाही अशा प्रकारच्या तक्रारी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहेत.

**वाचन**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या वाचन पंधरवडा उपक्रमाला आज राज्यात सुरुवात होणार आहे. यानिमित्त पुण्यात शासकीय विभागीय ग्रंथालयात येत्या 15 जानेवारीपर्यंत ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. पुणे जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य सचिव आणि उपजिल्हाधिकारी रामहरी भोसले यांच्या हस्ते या ग्रंथ प्रदर्शनाचं उद्घाटन होणार आहे.

**पुरस्कार**

केंद्र शासनाच्या एक जिल्हा एक उत्पादन पुरस्कारासाठी राज्यातल्या 14 जिल्ह्यांना नामांकन मिळालं आहे. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या काजू प्रक्रिया उद्योगाचा समावेश आहे. 2018 मध्ये वेंगुर्ला काजूला जीआय मानांकन मिळालं असून देशामध्ये काजूप्रक्रिया उद्योगात सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पहिला क्रमांक आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी दिली.

**निवृत्ती**

आकाशवाणीच्या मुंबई केंद्रातील अभियांत्रिकी संचालक राजकुमार ढवळे आणि अभियांत्रिकी उप-संचालक श्रीकृष्ण क्षीरसागर छत्तीस वर्षांहून अधिक लक्षणीय सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाले, यानिमित्त केंद्राच्या कर्मचाऱ्यांद्वारे त्यांच्या कार्याचा गौरव करुन त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. आकाशवाणी तंत्रज्ञानाच्या स्थित्यंतराच्या काळात या अधिकाऱ्यांनी अभ्यास आणि परिश्रमपूर्वक प्रसारणाची एक बाजू आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांसोबत सातत्यानं अद्ययावत राखली.

**पीक नुकसान**

राज्यात गेल्या दोन तीन दिवसांत झालेल्या पावसामुळं तसंच गारपिटीमुळं रबी पिकांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे.  सांगली, जळगाव आणि धुळे या जिल्ह्यांतल्या सहा तालुक्यांमधील 2639 हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. द्राक्षबागांसह तूर, गहू, हरभरा आणि भाजीपाल्याचंही मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

**क्रिकेट**

पुण्यात गहुंजे इथल्या मैदानावर सुरू असलेल्या महाराष्ट्र आणि तमिळनाडूच्या 19 वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट कसोटी सामन्यात काल महाराष्ट्रानं आपला पहिला डाव 309 धावांवर घोषित केला. ओम भाबड यानं 97 धावा केल्या. कालचा खेळ संपला त्यावेळी तमिळनाडू संघाच्या तीन गडी बाद 162 धावा झाल्या होत्या.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**.